

# साहित्यातून समाजदर्शन

संपादक

**डॉ. पांडुरंग भोसले**

सहसंपादक

**डॉ. राजेंद्र खंदारे**

**प्रा. वसंत गावडे**

**प्रा. व्यंकट सूर्यवंशी**

# साहित्यातून समाजदर्शन

संपादक : डॉ. पांडुरंग भोसले

डॉ. राजेंद्र खंदारे, प्रा. वसंत गावडे, प्रा. व्यंकट सूर्यवंशी

# Sahityatun Samajdarshan

Dr. Pandurang Bhosale, Dr. Rajendra Khandare,
Prof. Vasant Gawade, Prof. Vyankat Suryavanshi

---

प्रकाशक व मुद्रक

डॉ. उमा काळे-माळी

मारुती माळी

ज्ञानसूर्य प्रकाशन,

सर्व्हे नं. २१५, गंगानगर, पोस्ट फुरसुंगी,

ता. हवेली, जि. पुणे - ४१२ ३०८

भ्रमणध्वनी : ९७६५९०४१०३ / ९८८१२१५३६५

Email : umakaleswati@gmail.com

dnyansuryapublication@gmail.com

© डॉ. पांडुरंग भोसले,९४२३२५५०३८

आवृत्ती पहिली :

१ जानेवारी २०१८

ISBN-978-81-926144-9-6

प्रकाशन क्रमांक : १९

मुखपृष्ठ :

राजश्री जाधव, पुणे

अक्षरजुळणी :

सिद्धी ग्राफिक्स, पुणे

मुद्रण :

श्री गणेश मुद्रणालय, पुणे

किंमत : रु. २००

# अनुक्रमणिका


१) कवी अनिल यांच्या सामाजिक कविता : प्राचार्य डॉ. शोभा इंगवले ०७

२) स्त्री लेखिकांचे मराठी साहित्यातील योगदान : डॉ. गुंफा कोकाटे १३

३) साहित्य आणि समाज : डॉ. राजेंद्र खंदारे १८

४) बदलत्या कृषी जीवनाचे वास्तव: सिझर कर म्हणजेच माती : डॉ. देविदास गेजगे २१

५) १९९० नंतरच्या आदिवासी कवितेतील समाजदर्शन : डॉ. हनुमंत भवारी २६

६) नारायण सुर्वे यांची सामाजिक कविता : डॉ. पांडुरंग भोसले ३२

७) आधुनिक मराठी आत्मचरित्रातील सामाजिक व सांस्कृतिक दर्शन : डॉ. उमा काळे-माळी ३६

८) लोकनेते शाहीद पुंडलिक फरांदे यांच्या शाहिरीतील सामाजिकता : डॉ. संग्राम थोरात ४१

९) ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुषाचे समाजातील स्थान व महत्त्व : डॉ. पौर्णिमा कोल्हे ४६

१०) समाजजीवनाच्या वैचारिक जागृती व अभिव्यक्तीसाठीच रूपकात्मक नाटके : डॉ. नानासाहेब पवार ५०

११) साहित्य आणि चळवळ : डॉ. प्रभाकर पवार ५५

१२) व्यक्ती, साहित्य आणि समाज यांच्यातील पर्यावरणीय अनुबंध : नव्या दिशा : डॉ. प्रविण ससाणे ६५

१३) 'राहुकेतू'मधील समाजजीवन : डॉ. सोमनाथ दडस ६८

१४) आदिवासी कादंबरीतील समाजदर्शन : प्रा. सच्चिदानंद खडके ७५

१५) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील समाजजीवन : प्रा. वसंत गावडे ७९

१६) बंजारा लोकसाहित्यामधील समाजदर्शन : प्रा. तुकाराम चव्हाण ९०

१७) ग्रामीण कथेचा समाजशास्त्रीय अनुबंध : प्रा. नाना झगडे ९५

'बाय आणि गाय' यांच्यामध्ये फार साम्य वाटते. गरीब दावणीला बांधलेल्या मुक्या गायींचे जगणे आणि बाईचे जगणे सारखेच आहे असे त्यांना वाटते. गाय, बाय आणि पृथ्वीमाय एकरूप आहेत. तिघींचेही प्रयोजन पुरुषप्रधान आणि अपत्यसापेक्ष आहे. ज्या दिवशी तिघी नापीक होतील त्यादिवशी त्यांच्या जगण्याचे प्रयोजनच संपेल. इथे सर्जनाला महत्त्व नाही, फक्त उत्पादनाला महत्त्व आहे. ही ओरबडणारी संस्कृती आहे असे दुधाळ यांना वाटते. याचीच चिड, खंत कवितेत दिसते. गाय कवयित्रीला म्हणते.

**'बाई गं... तु काय नि मी काय,**
**जन्मभर दावणीला बांधलेलो...**
**शरीरातून शरीर बाहेर पडलं,**
**आणि रुजव्याची माती नापीक झाली, की**
**पडिकात कुणी फिरकत नाही'** (बाय आणि गाय)

परंपरेने चालत आलेल्या स्त्रीकडे पाहण्याच्या या दृष्टिकोनामुळे तिने जीव दिला तरी पंचनामा, पोस्टमार्टम होऊन सरणावर जाईपर्यंत तिला या व्यवस्थेत लढावच लागेल असे कवयित्रीला वाटते.

'सिझर कर म्हणतेय माती' हा कवितासंग्रह शेती आणि शेतकरी यांच्या समकालीन समस्या मांडताना विद्रोही वाटेने जाताना दिसतो. कृषीसंस्कृतीतील बदल, जागतिकीकरण यांसारख्या विषयांवर कवयित्री अत्यंत वास्तवपणे लिहितात.

'सऱ्या-वरंबे ओढलेल्या रानात, **www** दिसायचं आणि माती ग्लोबल झाली असं वाटायचं' कल्पना दुधाळ यांच्या कवितांचा गौरव करताना उत्तम कांबळे म्हणतात, 'एक बहुआयामी आणि अस्वस्थ श्वास सोडणारी कविता प्रत्येकाला अस्वस्थ करते. मोठा पिसारा घेऊन ती जागतिकीकरणाला आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना पकडते. विशेष म्हणजे वाचकांना पकडून त्याला विचार करायला लावते.'[३] एकूणच काय सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक सामिलकीचे भान आणि जाण कल्पना दुधाळ यांच्या कवितेत पदोपदी प्रत्ययाला येते.


**संदर्भग्रंथ :**

१. करंदीकार गो. वि., परंपरा आणि नवता, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९६७,पृ. ४७.
२. पाठक वा. भा., आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६४, पृ. १४६
३. दुधाळ कल्पना, 'सिझर कर म्हणतेयं माती', कांबळे उत्तम, 'मातीतून । उगवलेल्या कवितेविषयी', नवसिद्धांत प्रकाशन, नाशिक, पृ.९




# १९९० नंतरच्या आदिवासी कवितेतील समाजदर्शन


**डॉ. हनुमंत भवारी**


आदिवासी साहित्यप्रकारामध्ये आदिवासी कवितेचे दालन समद्ध आहे. सर्वच वाङ्मयप्रकारामध्ये काव्यलेखनानेच सुरूवात झालेली आहे. त्याला आदिवासी साहित्यदेखील अपवाद नाही. आदिवासी काव्यासंदर्भात डॉ. विनायक तुमराम म्हणतात ''आदिवासी आणि काव्य यांचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासी सर्वात प्रथम बोलला तो काव्यातूनच, जीवनात येणाऱ्या विविध प्रसंगांना धैर्याने तोंड देताना त्याच्या तोंडून काव्यही तेवढ्याच सहजतेने बाहेर पडले आहे. प्रसंगानुरुप काव्यनिर्मिती करणारा आदिवासी केवळ रचियताच नाही, तर तो गायक आणि नर्तकही आहे. गाणे, वाजविणे आणि नाचणे हे तर त्याच्या रक्तातच भिनले आहे. अनेक अनामिक आदिवासींच्या काव्यरचना काळाच्या उदरात गडप झाल्या व काही हाती लागल्या. त्यांना आपण लोकगीते म्हणून संबोधतो. काव्याच्या निर्धारित साच्यानुसार ती उतरत नसली तरी 'सहजस्फूर्त' प्रकटन असे त्यांचे वर्णन करता येईल. 'Poetry is the spontaneous overflow of powerful feelings'. या Word'sworth च्या विधानानुसार आदिवासींच्या पारंपरिक रचनाही कविता ठरतात.''[१] डॉ. तुमरामांच्या विधानावर आदिवासींच्या अनुभव प्रकटीकरणाची सुरुवात ही काव्यापासून झाली.

आदिवासी साहित्यामध्ये इतर साहित्याप्रमाणेच काव्यलेखनानेच साहित्याची सुरुवात झाल्याची आढळते. त्यामुळे आदिवासी काव्यदालन आज समृद्ध असल्याचे दिसते. सुरुवातीपासून अनेक कवींनी आपले अनुभव आपले दु:ख, वेदना मांडण्यासाठी काव्याचा आधार घेतला. दलित कविता, ग्रामीण कविता यांच्या पाठोपाठ आदिवासी कविताही सक्षम होऊ लागली. आदिवासी साहित्यिकांनी आपली साहित्ययात्रा काव्याच्या या पहिल्या पायरीपासूनच आरंभलेली दिसते. कवितेनेच लेखनाची सुरूवात केलेली दिसते. १९९० अगोदरही अनेक कविंनी आपल्या काव्यलेखनाचा ठसा उमटविला आहे. त्या कवींचे लेखन पुढे चालूच आहे, परंतु १९९० नंतर अनेक कवींनी काव्यलेखनात भर टाकली अनेक नवकवींनी काव्यलेखनास याच कालखंडामध्ये सुरुवात केलेली आढळते. आदिवासींची आज तिसरी पिढी काव्याच्या या समृद्ध दालनात

नव्याने भर टाकण्यास सज्ज झालेली आहे. त्यांच्याबरोबरच स्त्रियांनीसुद्धा आपला मोलाचा वाटा उचलला आहे. आदिवासी कवितेला खूप मोठी परंपरा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करायचा झाल्यास, गोविंद गारे, वाहरू सोनवणे, डॉ. विनायक तुमराम, डॉ. उत्तमराव धोंगडे, यांच्यापासून ते डॉ. संजय लोहकरे, मनोहर मोहरे, हनुमंत भवारी, संतोष केंगले, अशोक पेकारी, या कवींपर्यंत असे अनेक कवी-कवयित्री सक्षमरित्या काव्यलेखन करताना दिसत आहेत. येथे काही निवडक कवींच्या कवितांचे संदर्भ समजून घेणे अभिप्रेत आहे, त्यात भुंजग मेश्राम, प्रा. वामन शेळमाके, कृष्णकांत चांदेकर, उषाकिरण आत्राम, सौ. कुसूम आलाम, सिता भोजने या कवींच्या कविता प्रामुख्याने विचारात घेता येतील.

**भुंजग मेश्राम:** यांचा 'उलगुलान' हा काव्यसंग्रह १९९५ ला प्रकाशित झाला. त्यांनी संपादित कवितासंग्रह प्रकाशित केला होता. हा त्यांचा दुसरा कविता संग्रह आहे. आदिवासी काव्य लेखनामध्ये भुजंग मेश्राम हे एक मोठे नाव आहे. त्याच्या संदर्भात शतकातील आदिवासी कविता या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. विनायक तुमराम म्हणतात, "आदिवासी कवींमध्ये भुजंग मेश्राम हे एक महत्त्वाचे नाव : सामाजिक जाणिवेचे ते एक चिंतनशील कवी आहेत. आदिवासींच्या दुःख, व्यथांना वाचा फोडणारा आणि त्यांची सांस्कृतिक अस्मिता जागविणारा एक द्रष्टा आणि क्रांतीमान कवी म्हणून साहित्य जगतात त्यांचा लौकिक आहे." आपले दुःख, वेदना अंतःकरणात सलत असताना कवी निसर्गातून खळखळ वाहणाऱ्या नर्मदेशीच बातचित करतो. 'बातचित नर्मदेशी' या कवितेत कवी भुजंग मेश्राम म्हणतात,

"जंगलाचे ठेकेदार पेरतात पर्यावरणी चळवळ
गंगेच्या व्यभिचारी पोटात होते मळमळ
चिपकून चिपकून घट चाळवताना
फ्रंटपेजवर त्यांची बांधिलकी कळकळ
आम्ही कितीही पेटवले रान
तरी ठरतो फुटकळ"

आदिवासी समाजाचे भांडवल करून त्यांच्या नावावर पोट भरणारे ठेकेदार फक्त प्रसिद्धीसाठी पेपरच्या पहिल्या पानावर झळकण्यासाठी किती धडपड करताना दिसतात, परंतु ज्यांच्यासाठी हया गोष्टी करताहेत ते मात्र त्यांच्या पुढे फुटकळ म्हणजे किरकोळ, कमी महत्त्वाचे असे ठरताना दिसतात. अशा दुधारी व्यवस्थेचा न्यायनिवाडा तूच कर अशा पद्धतीचा संवाद ते नर्मदा नदीबरोबर करताना दिसतात.

तसेच गाव बांधणी या कवितेतून रूढी परंपरांच्या नावाखाली चाललेले आंधळे व्यवहारही ते मांडतात. उदा.



"भगत बांधते पोटाचं आंगणं -
दारू करते उलंगवा पंच देते पैशाचा बंड
शिकवते गरिबीची बटाई - बळी राजाचं नाव घेता
कोंबड्या बकऱ्यांचा बळी"

अंधश्रद्धा नष्ट करून चांगल्या गावाच्या निर्मितीचा ध्यास कवीने घेतला आहे. भाषिक [illegible], विविध विषय हाताळण्याची हातोटी, नेमकेपणाने केलेली विषयाची मांडणी, सादरीकरणाचे कसब यामुळे भुजंग मेश्रामांनी कविता एक वेगळी उंची गाठते. म्हणून आदिवासी कवींमध्ये 'उलगुलान कार' म्हणून ओळखला जाणारा कवी निश्चित 'उलगुलान' घडविण्याची [illegible] आहे.

**प्रा. वामन शेळमाके :** यांचा 'जागवा मने पेटवा मशाली' हा १९९१ साली प्रसिद्ध झालेला पहिलाच कवितासंग्रह, प्रा.शेळमाके यांना एक सामाजिक दृष्टी आहे. सामाजिक भान आहे. कवी म्हणून ते लोकप्रिय तर आहेतच, परंतु आदिवासींमधील एक खंदा कार्यकर्ता म्हणून आदिवासी समाजामध्ये त्यांचे नाव आहे. आदिवासी समाजाला व आदिवासी साहित्याला त्यांच्या लेखनामुळे एक नवा आशावाद मिळाला आहे. ते आपल्या मुक्तीचा संदर्भ या कवितेत म्हणतात,

"जन्मलास तू काटेरी पिंजऱ्यात
शतकातील आदिवासी कविता
वाटण्यास गुलामीच्या काळोखात
पण तुला शपथ घेऊन सांगतो आहे
मरू देणार नाही तुला
या वणव्याच्या पसाऱ्यात
येत आहोत आम्ही
तुझ्या मुक्तीचा संदर्भ घेऊन"

आदिवासींचे वास्तव जरी आज कसेही असले तरी त्याला या वणव्यातून वाचविण्याचा [illegible] कवी आपल्या कवितेतून मांडतो. या समाजाला मुक्त करण्यासाठीच आपण जन्म घेतला आहे, म्हणून कवी शपथ घेऊन सांगण्याचा प्रयत्न करतो की, माझ्या बांधवाला मी या गुलामीच्या काळोखात मरू देणार नाही. सरळ साधी -सोपी भाषा ही शेळमाके यांच्या कवितेचे वैशिष्ट्य ठरते.

**कृष्णकुमार चांदेकर :** कृष्णकुमार चांदेकरसुद्धा एक सक्षम कवी म्हणून आदिवासी कवींमध्ये ओळखले जातात. 'कॅमेरा' या कवितेत ते म्हणतात,

"नागवे होऊन जंगल फिरलो
तेव्हा कॅमेरे आमच्या पाठीशी होते
अस्मितेचे बंड पुकारले
तेव्हा पोलिस आमच्या पाठीशी होते."

दोन्हीकडून जगू न देणारी व्यवस्था रेखटतांना कवी संघर्षमय पवित्रा घेतात.

**उषाकिरण आत्राम :** उषाकिरण आत्राम यांचे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. 'म्होरकी' आणि 'लेखनाच्या तलवारी' आदिवासी स्त्रियांच्या काव्य लेखानास त्यांच्यापासूनच सुरुवात झाली असे म्हणण्यास हरकत नाही. आदिवासी स्त्री ही समाजव्यवस्थेतील मुख्य प्रवाहापासून फार दूर आहे. तिच्या दुःख वेदनांना कोणी आजपर्यंत समजून घेतले नाही. आजही तिचा आक्रोश कोणाच्या कानापर्यंत पोहचत नाही. तिच्या अशिक्षितपणामुळे आजही तिला रूढी-परंपरेच्या जोखडातून बाहेर पडता आले नाही. तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार दूर करून तिला स्वातंत्र्यांची ओळख पटवून देणे, ही कवयित्रीची अपेक्षा आहे. हा रूढी परंपरेच्या नावाखाली स्त्रीला आजही बंदीवासात ठेवणारा समाज, वेठबिगारीच्या नावाखाली स्त्रियांना गुलाम बनविणारा समाज, आदिवासी तरुणींवर वाईट नजर ठेवणारा समाज, तिच्या शील-चारित्र्याचा बाजार मांडणारा समाज, कवयित्री आपल्या कवितेतून चित्रित करते. त्यामुळे अशा साध्या-भोळ्या असहाय्य आदिवासी स्त्रीची स्थिती-गती पाहून कवयित्री सतर्कतेचा इशारा देतांना म्हणते,

'वाटेनं -जातेस - जर समद्या डोयाले आग लागन
राणे ! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्पायची
म्हणून म्हणते, तू रातराणी होऊ नगं !
व्हशील तं -पयसाची लाल तांबडी आग व्हय !
नायतं बिब्याची फुलं व्हय !'

या कवितेमधून कवयित्रीने भोगवादी समाजव्यवस्थेचे दर्शने घडविले आहे. आजचा समाज सुधारलेला आहे. पुढारलेला आहे, परंतु स्त्रियांच्या बाबतची भूमिका अजूनही बदललेली नाही. त्यामुळे या भोगवादी सुधारलेल्या बाप्पयांना धडा शिकवायचा असेल तर, तू रातराणी सारखी कोमल, निरागस राहू नकोस, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करायला शिक. स्वतःच, स्वतःचे संरक्षण करायला शिक. त्यासाठी आता पळसाची लाल आग किंवा बिब्याची फुले होण्याचा इशारा कवयित्री या आदिवासी तरूणीला देत आहे. सुधारणा वादाचा आव आणणाऱ्या समाजाच्या वृत्तीचे अस्सल दर्शन या कवितेच्या माध्यमातून घडते.



**कुसुम आलाम :** कुसुम आलाम यांचे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'रान आसवांचे तळे' व 'रान पाखरांची माय' या दोन्ही कवितासंग्रहामधून कवयित्री आदिवासींच्या व्यथा, वेदना त्यांचे दुःख त्यांचा आक्रोश मांडतांना दिसते. आदिवासी स्त्रियांवर होणारा अन्याय मांडता मांडता स्त्रीमधील सामर्थ्याची जाणिवही त्यांना करून देते. एवढेच सांगून त्यांची कविता थांबत नाही, तर त्यांची कविता आत्मशोध घेत फिरते. नक्षलवादी आणि पोलिस यांच्यामुळे आदिवासींची कशी ससेहोलपट होते, याचे चित्र रेखाटते. पुढारलेला समाज आदिवासी साम्राज्याला कशा पद्धतीने छळतो याचा लेखाजोखाच ही कविता मांडते. 'बेडीबंद' या कवितेतून कवयित्री म्हणते,

"कदाचित झुडपाआडून एखादा कॅमेरा
तुझ्या आसिम सौंदर्याला
बेडीबंद तर करत नाही ना .....।
तुझ्या छातीवर नसलेला पदर आणि ....।
दारिद्र्यापोटी उघडया ठेवाव्या लागणाऱ्या मांडया -पोटऱ्या
त्यांच्या फोटोग्राफीला यश मिळवून देतात आणि ....।
आर्ट गॅलरीत फेरफटका मारणारे लाळघोटे
जिभल्या चाटत असतात ।"

आजही प्रस्थापित समाजातील काही माणसं आदिवासींच्या वेदनेला प्रदर्शनात मांडतात. त्यांचे भांडवल करतात. सहानुभूतीच्या नावाखाली त्यांच्या खाजगी आयुष्याचा अक्षरशः बाजार मांडतात. आर्ट गॅलरीमधील आदिवासींच्या नागव्या आयुष्याकडे पाहताना, आपलेच संपूर्ण समाधान सिध्द करतात. म्हणून लेखिका निसर्गाच्या सान्निध्यात आपल्या धुंदित मग्न असलेल्या आदिवासी तरूणीला सावध करताना दिसते. या कवितांमधून कवयित्री समाजातील समाज सेवेच्या दिखाऊवृत्तीचे व ढोंगी प्रवृत्तीचे दर्शन घडविते.

**सीता भोजने :** आदिवासींमधील नवकवयित्री म्हणून सीता भोजने यांचा उल्लेख करता येईल. त्यांच्या 'फडकी' मासिकांमधून अनेक कविता प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा 'डोंगरमाथा' नावाचा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविता -घडविता त्यांची कविता आदिवासींच्या हालअपेष्टांचीही कैफियत मांडते. आदिवासी समाजाची सांस्कृतिक बाजू भक्कम आहे. त्यांच्या संस्कृतीचे अनुकरण आता बरीच मंडळी करताना दिसते आहे. सांस्कृतिकदृष्ट्या श्रीमंत असलेली ही माणसं, आर्थिकदृष्ट्या मात्र फारच गरीब आहेत. मुळात पैसा मिळविण्याचे कोणतेच साधन त्यांच्या पाड्यांवरती किंवा वाड्यावस्त्यांवर उपलब्ध नाही.

त्यासाठी शहरामध्ये जावे लागते. म्हणून कवयित्री सीता भोजने आपल्या कवितेमधून म्हणतात.

"देसामंदी चाल जीवा
पोर लगनाला आली
पई-पई जमवून
हुंडा देऊन इकली"
"देसा मंदी चाल जीवा
पॉर शिकाताई शाळा
लई महाग शिक्षण
जसा फास लागं गळा"

आज आदिवासी भागातील लोकांचे जगणे पैशाअभावी मुश्कील झाले आहे. पैसा कमवायचा असेल तर शहरामध्ये जावे लागणार! मुलीचे लग्न किंवा मुलांच शिक्षण पैशाशिवाय करता येणार नाही. ही खंत कवयित्री या कवितेतून व्यक्त करते.